ठाणे, सोमवार दि. १२ ऑगस्ट २०२४ | वर्ष : १३, अंक : १०५ , पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे | संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**बांगलादेशातील अस्थैर्य अमेरिकेमुळे ?**

बांगलादेशमध्ये गेल्या काही दिवसांपासून हिंसाचाराच्या घटना सुरु आहेत. हिंसाचाराच्या घटनांनतर शेख हसीना यांनी ५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान पदाचा राजीनामा देत देश सोडला.

......पान २ वर



**फांगूळगव्हाण पूलाचा प्रश्न सुटला..!**

...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



काय हो जनाभाऊ,या खड्डयांच्या मागे अनेक अदृश्य शक्ती असल्याचा भास मला नेहमीच होतो !

# तुम्ही जशास तसे नव्हे तर जशास दुप्पट उत्तर दिलेत...

**राज्यानंतर मनसेप्रमुख राज ठाकरे यांची सोशल मिडियावरील पोस्ट ...**

**मुंबई: राज ठाकरे यांच्या गाडीवर सुपाऱ्या फेकल्यामुळे आक्रमक झालेल्या महाराष्ट्र सैनिकांनी शनिवारी ठाण्यात उद्धव ठाकरे यांच्या गाड्यांच्या ताफ्यावर नारळ भिरकावले होते. तसेच उद्धव यांच्या गाडीवर शेणफेक केली होती. मनसेच्या या राड्यानंतर महाराष्ट्रातील राजकारण प्रचंड तापले असतानाच आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आहे. तुम्ही जशास तसं नव्हे तर जशास दुप्पट प्रत्युत्तर दिले आहे. मात्र, आता सुमारांच्या नादी लागू नका, असे सांगत राज ठाकरे यांनी आपल्या बाजूने या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.**

## राज ठाकरेंची महाराष्ट्र सैनिकांच्या पाठीवर कौतुकाची थाप

## तुम्ही सगळं हे थांबवा... | ठाकरेंच्या ताफ्यावर हल्ला अन् मनसेच्या राड्यानंतर राज ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया



सस्नेह जय महाराष्ट्र,

काल ठाण्यात उद्धव ठाकरे यांच्या वाहन ताफ्यासमोर माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी जी निदर्शनं केली, ती संतापातून आलेली प्रतिक्रिया होती. माझ्या नवनिर्माण यात्रेच्या दरम्यान जी काही विघ्न उभी करण्याचे प्रयत्न धाराशिवपासून सुरु झाले. धाराशिवमध्ये निदर्शनाला आलेले, दाखवायला मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या नावाखाली घोषणा देत होते. पण पुढे लक्षात आले की त्यांचा या आंदोलनाशी काहीच संबंध नव्हता. ते तर शरद पवार आणि उद्धव ठाकरे गटांशी संबंधित होते. या सगळ्या गोष्टी सोशल मीडियातून उघड्या पडल्या. बीडमध्ये तर उघडपणे उबाठा शिवसेनेच्या जिल्हाध्यक्षाने निदर्शनाच्या नावाखाली फार्स केला आणि त्यावर कुठेही निषेधाचा सूर लवकर न उमटल्यामुळे माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी जे केलं ते केलं. या संपूर्ण काळात महाराष्ट्र सैनिक ज्या पद्धतीने सावध राहिला तसं त्याने यापुढे देखील रहावं.



मी कालच्या पत्रकार परिषदेत पण सांगितलं होतं की माझ्या नादाला लागू नका कारण माझा महाराष्ट्र सैनिक काय करेल हे तुम्हाला कळणार नाही. आणि ज्याची प्रचिती कालच आली. मुळात आपण महाराष्ट्रात आहोत, हे भान एकूणच राजकीय व्यवस्थेचं कमी होऊ लागलं आहे. राजकारण म्हणलं की मुद्यांची लढाई आलीच. एकमेकांवर शाब्दिक तिखट वार हे देखील होणार. पण म्हणून कोणीही उठून, कोणाहीबद्दल काहीही बोलावं आणि कुठल्याही थराला जाऊन दौऱ्यामधे विघ्न निर्माण करण आणि टीआरपी मिळतोय किंवा काहीतरी बातम्यांचे गुऱ्हाळ चालवायला बातमी मिळत आहे, म्हणून अशा थोबाड उचकटणाऱ्याना, माध्यमांनी पण उचकवणं थांबवलं पाहिजे. या सगळ्यातून महाराष्ट्रात तणाव वाढेल अशी कोणीतही परिस्थिती निर्माण होऊ देऊ नका.

माझ्या पक्षात तर आपल्यापेक्षा मोठ्या नेत्यांच्या बाबतीत हे असले प्रकार, अगदी पक्ष स्थापनेपासून महाराष्ट्र सैनिकांनी कधी केले नाहीत आणि चुकून त्यांनी केले तरी ते मी खपवून घेणार नाही याची त्यांना पण जाणीव आहे. आणि लोकं हे पण म्हणतील तुम्ही मुद्द्याचं बोलताय, तुम्ही गुद्दे पण देताच की... हो आम्ही देतो गुद्दे.... (पान २ वर)

### नेमकं काय घडलं ?

राज ठाकरे हे मराठवाड्याच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या गाड्यांच्या ताफ्यासमोर ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी सुपाऱ्या टाकल्याची घटना घडली होती. ही गोष्ट मनसेच्या मोठी जिव्हारी लागली. त्यानंतर मनसेच्या नेत्यांकडून प्रतिक्रियाही आल्या. खुद्द राज ठाकरेंनीही यावर प्रतिक्रिया देत, माझ्या नादी लागू नका नाहीतर कार्यकर्त्यांचं मोहोळ उठलं तर सभाही घेऊ देणार नाहीत असा इशाराच दिला.राज ठाकरेंच्या इशाऱ्यानंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यांना तशी संधीही मिळाली. शनिवारी संध्याकाळी ठाण्यातील रंगायतन सभागृहात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या दरम्यान ठाण्यात उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर मनसैनिक आणि महिला कार्यकर्त्यांकडून बांगड्या, नारळ आणि शेण फेकण्यात आले. तर सभास्थानी गडकरी रंगायतन परिसरातही ठाकरेंचा बॅनर फाडुन महिला कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरे विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.यावेळी सभेसाठी जमलेले उबाठाचे कार्यकर्ते आणि शेकडो मनसैनिक समोरासमोर आल्याने मोठा तणाव निर्माण झाला होता.

## ॲक्शनला रिॲक्शन येणारच...!

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया**



मुंबई – ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत ठाण्यात काल रात्री (१० ऑगस्ट) मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी उद्धव ठाकरेंच्या गाड्यांच्या ताफ्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शेण आणि बांगड्या फेकण्यात आल्याचा प्रकार घडला. त्यामुळं ठाण्यात रात्रभर राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं दिसून आलं आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. खरी सुरुवात ही राज ठाकरे यांच्या दौऱ्यामध्ये झाली. मराठवाड्यात राज ठाकरेंचा ताफा अडवला गेला. त्याच क्शनला आज रिॲक्शन दिल्याचे आज पाहायला मिळालं, परंतू, असं (पान २ वर)

■ **मातोश्री सोडून दिल्लीला लोटांगण, मुख्यमंत्र्यांचा ठाकरेंना टोला...**

■ **बाळासाहेबांनी उद्धव ठाकरेंना जंगलात फोटोग्राफी करण्यासाठी पाठवलं असतं**

**थोडक्यात घडामोडी**

## ऑलिम्पिक विजेत्या या खेळाडूंनी नाकारली सरकारी नोकरीची ऑफर



नवी दिल्ली – पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारताला नेमबाजीच्या स्पर्धेत तीन पदके मिळाली. सरबज्योत सिंग आणि मनू भाकर यांनी भारताला कांस्य पदक मिळवून दिले. मनू भाकर आणि सरबज्योत सिंग यांनी नुकतीच हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांची भेट घेतली. या दोघांनाही हरियाणा सरकारने नोकरीची ऑफर दिली आहे. मात्र दोघांनीही हे सरकारी काम करण्यास नकार दिला आहे. सरबज्योत सिंग आणि मनू भाकरने नोकरीची ऑफर न स्वीकारण्याचे कारणही दिले आहे.

हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांचे मीडिया समन्वयक मुकेश वशिष्ठ यांनी या मुद्द्यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, मनू भाकर आणि सरबज्योत सिंग यांनी सरकारी नोकरी करणार नसल्याचं त्यांनी सांगितलं. दोघांचं म्हणणं आहे की ते नोकरीसाठी नव्हे, तर सुवर्ण पदकांसाठी खेळत आहे. दरम्यान, मनू भाकर आणि सबरज्योत सिंग यांना क्रीडा विभागात उपसंचालकपदाची ऑफर देण्यात आली होती.

## महाराष्ट्रातील १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर जाणार, सर्वसामान्यांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता

**मुंबई – महाराष्ट्रातील तब्बल १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीची आज मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीचे मुख्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी याबाबत माहिती दिली. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शन प्रमाणे नवीन पेन्शन देण्याच्या मुद्द्यावर संप पुकारला आहे.**

कृती समितीचे प्रमुख विश्वास काटकर यांनी स्वत: याबाबत माहिती दिली आहे. राज्य सरकारने तात्काळ नोटिफिकेशन काढण्याची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे. तसेच नोटिफिकेशन निघत नाही तोपर्यंत संप सुरु ठेवण्याचा निर्धार संबंधित कर्मचारी संघटनेने केला आहे.

### विश्वास काटकर नेमकं काय म्हणाले ?

महाराष्ट्रातील १७ लाख सरकारी, निम सरकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जातील, असा निर्णय आज मुंबई येथील समन्वय समितीच्या विस्तारीत सभेत झाला. राज्य सरकारने पेन्शनबाबत जे आश्वासन दिलं ते अद्याप पाळण्यात आलेलं नाही. सामाजिक आणि आर्थिक सुलक्षण म्हणून जुन्या पेन्शन प्रमाणे पेन्शन मिळेल, असं आश्वस्त करुन सुद्धा त्या संदर्भातील नोटीफिकेशन निघू शकलेलं नाही. त्यामुळे सर्व कर्मचारी, शिक्षक हे चिंतेत आहेत, असं विश्वास काटकर म्हणाले.

आगामी विधानसभा निवडणुकीआधी पुन्हा आचारसंहिता लागू होण्यापूर्वी कोणते निर्णय किती वेळात घेतले जातील, याची साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळेच राज्य सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांची सहनशीलता संपलेली आहे. त्यामुळे त्यांनी २९ ऑगस्टपासून राज्यभरात बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, अशी माहिती विश्वास काटकर यांनी दिली.



## उबाठा गटाच्या उपनेत्या अनिता बिर्जे यांचा शिवसेना शिंदे गटात पक्षप्रवेश

मुंबई – शिवेसनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे पक्षाच्या मेळाव्यानिमित्त शनिवारी (१० ऑगस्ट) ठाण्यात असतानाच त्यांच्या पक्षाला ठाण्यात मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेच्या जुन्या कार्यकर्त्या, तसेच दिवंगत शिवसेना नेते आनंद दिघे यांच्या सहकारी अनिता बिर्जे यांनी ठाकरे गटाची साथ सोडून शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला आहे. शिवसेना पक्षप्रमुख व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रात्री हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या पक्षप्रवेश सोहळ्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की अनिता बिर्जे यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली आगामी काळात शिवसेना अधिक जोमाने काम करेल.

एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे की उबाठा गटाच्या उपनेत्या आणि आनंद दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या कट्टर शिवसैनिक अनिता बिर्जे यांनी आज आनंदआश्रमात येऊन शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना भावी सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिंदे यांनी म्हटलं आहे की शिवसेनेच्या जडणघडणीच्या कालखंडात अनिता बिर्जे यांनी तत्कालीन शिवसैनिकांच्या साथीने शिवसेनेची महिला आघाडी तळागाळात पोहोचवली होती. त्यांच्या शिवसेना प्रवेशामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे तसेच आनंद दिघे यांच्या विचारांवर (पान २ वर)

## ठाण्यात आधार सहकारी पतपेढीची ३० वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न

ठाणे – आधार सहकारी पतपेढी मर्यादित ठाणे या पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा ११ ऑगस्ट रोजी नुरी हॉल, मखमली तलाव, चंदनवाडी, ठाणे येथे अनेक मान्यवर, प्रशासकीय अधिकारी व सभासदांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. प्रसंगी संस्थेची अद्यावत स्थिती, पाच शाखांचे ८२१९ सभासद संख्या, संस्थेचे खेळते भांडवल ११६ कोटी, संमिश्र व्यवसाय १६० कोटी व निव्वळ नफा १-१५ कोटी झाला असून संस्थेने अ वर्ग राखला आहे. प्रसंगी इतिवृत मंजूर करणे, लेखापरीक्षण करणे, दिलेली व वसूल कर्जे, संस्थेचा नफा व तोटा तसेच यावेळी १२% लाभांश मंजूर करण्यात आला.आठ हजार पेक्षा जास्त सभासद असलेल्या पतपेढीच्या सर्वसाधारण सभेस मा. आमदारांसह अनेक प्रशासकीय अधिकाऱ्यांसह अनेक मान्यवरांचा अध्यक्ष भरतशेठ दांगट यांच्यासह इतर उपस्थित संचालकांकडून सन्मान करण्यात आला. प्रसंगी मा. आमदार बाळासाहेब दांगट (जुन्नर), (पान २ वर)






(छाया - मनोज सिंह)

■ भारताचा स्वातंत्र्याचा दिवस काही दिवसांवरच येऊन ठेपला असताना ठाण्याच्या कोलशेत रोड परिसरातील लोढाआमारा या गृह संकलनातील रहिवाशांनी स्वतंत्र दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीचे जैन समाजाचे ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष राकेश जैन यांच्या माध्यमातून देशभक्तीवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला ठाणे शहराचे जनसेवक आमदार संजय केळकर यांनी या गृह संकुलातील पाणी समस्या असो, कचरा असो अशा विविध समस्यांचे निरासन केल्याबद्दल रहिवाशांतर्फे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला यावेळी कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे जनसेवक आमदार संजय केळकर भारतीय जनता पार्टीचे ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, माजी घटनेचे व माजी नगरसेवक मनोहर डोंगरे भाजपा जैन समाजाचे ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष राकेश जैन भाजपा भाजपा उपाध्यक्ष रविराज रेड्डी सह गृह संकलनातील रहिवासी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज केलेल्या महिलांनी आपले बँक खाते आधारकार्डशी संलग्न करावे**


## त्रुटी असलेल्या अर्जांबाबत संबंधित महिलांनी तात्काळ आशासेविका/अंगणवाडी सेविका/ ग्रामसेवकांशी संपर्क साधावा

**ठाणे – मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण योजनेसाठी ठाणे जिल्ह्यातून एकूण ५ लाख ३ हजार ८० अर्ज पात्र ठरले असून ३७ हजार अर्ज त्रुटीयुक्त आहेत. मात्र अद्याप ज्या महिलांचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न केलेले नाही, अशा महिलांनी संबंधित बँकेत जावून बँक खाते आधार कार्डशी संलग्न करण्याची कार्यवाही करून घ्यावी, तसेच त्रुटी असलेल्या अर्जांच्या बाबतीत संबंधित महिलांनी तात्काळ आशा सेविका/ अंगणवाडी सेविका/ ग्रामसेवक किंवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड व जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) संजय बागूल यांनी केले आहे.**

या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या आधार संलग्न बँक खात्यात दरमहा एक हजार पाचशे रुपये रक्कम जमा केली जाणार आहे. यासाठी संबंधित महिलेचे बँक खाते आधार संलग्न (आधार सीडिंग) केलेले असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करताना अर्जामध्ये नमूद आधार क्रमांकाला संलग्न केलेल्या बँक खात्यात लाभाची रक्कम थेट (डीबीटीद्वारे) जमा केली जाणार आहे. त्यामुळे महिलांनी आपले बँक खाते आधार संलग्न करून घेणे आवश्यक आहे. तसेच बँक खात्याची ई-केवायसी करणेही आवश्यक आहे. ई-केवायसी करण्याची कार्यवाही नजीकच्या सेतू केंद्रावर करता येईल. मात्र, बँक खाते आधार संलग्न करण्याची कार्यवाही संबंधित बँकेत जावून करणे आवश्यक आहे.

बँक खाते आधार संलग्न करण्याबाबत जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आणि संबंधित बँकांना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. योजनेसाठी अर्ज सादर करताना काही महिलांनी आपले खाते आधार संलग्न नसल्याचे नमूद केले आहे. अशा महिलांनी आपले बँक खाते आधार संलग्न करण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी, (पान २ वर)



**जिल्हा प्रशासनाचे महिलांना आवाहन**

## तुम्ही जशास तसे नव्हे तर जशास दुप्पट उत्तर दिलंत,

**(पान १ वरून)** महाराष्ट्रातील असंख्य प्रश्नांसाठी, माता, भगिनींसाठी आम्ही याआधी गुद्दे दिलेत आणि यापुढे देऊ. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सत्तेत येऊन लोकांचे प्रश्न सोडवायचेत आणि त्यासाठी वेळेस दोन ठोसे हाणायची वेळ आली तर ते पण करूया. कारण ती शक्ती लोकांसांठी वापरली जाणार आहे. त्यामुळे माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी असल्या सुमार लोकांसाठी तुमची शक्ती वाया घालवू नका.

फक्त 'जशास तसे' नाही तर, 'जशास दुप्पट तसे' उत्तर देणं म्हणजे काय असतं याची चुणूक काल तुम्ही दाखवलीत, ती पुरेशी आहे. त्यामुळे तुम्ही सगळं हे थांबवा असं माझं, माझ्या महाराष्ट्र सैनिकांना आवाहन आहे. महाराष्ट्राची राजकीय परिपक्वता, राजकीय मतभेद झाले तरी मनभेद होऊ द्यायचे नाहीत, ही संस्कृती किमान आपल्याकडून पुसली जाणार नाही हे आपण पाहूया. पण हे करताना तुमच्या नावावर खपवून, परस्पर पक्षाला बदनाम करण्याचे प्रकार कुठे घडत नाहीयेत ना याकडे पण लक्ष ठेवा. महाराष्ट्रात शांतता नांदेल, इथल्या निवडणुका शांततेत पार पडतील हे किमान आपण तरी नक्की पाहूया. आणि तरीही नतद्रष्ट सुधारणार नसतील, तर त्यांचं काय करायचं ते नंतर पाहू.

यांत काही मोजके पत्रकार, त्यांच्या हातातील वर्तमानपत्र असो की एखादं चॅनेल, याचा उपयोग लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी शस्त्र म्हणून वापरायचं सोडून, स्वतःच्या फायद्यासाठी त्याचा हत्यार म्हणून वापर करत आहेत हे उघड झालं. समाजात कसा द्वेष पसरवता येईल, एखाद्याचं प्रतिमाहनन कसं होईल हे पाहत आहेत. तुम्ही ते आर्थिक लाभासाठी करताय की अजून कशासाठी करताय, याच्याशी मला देणंघेणं नाही. मूठभर राजकीय नेते आणि मूठभर पत्रकार यांचे आर्थिक हितसंबंध त्यांना लखलाभ. पण जे तुम्ही करताय ते दुधारी शस्त्र आहे आणि त्यातून जो वणवा पेटतोय त्यात तुम्हीच खाक व्हाल हे विसरू नका.

जाता जाता इतकंच सांगतो की, या राज ठाकरेच्या आणि माझ्या महाराष्ट्र सैनिकांच्या नादी लागू नका. मी मागे पण बोललो आहे, काल पण बोललो आहे, तुम्ही प्रस्थापित असाल पण विस्थापितांची शक्ती माझ्या पाठीशी उभी आहे हे विसरू नका. हे तुमच्या काळजीपोटी सांगतोय असं समजा.

### ॲक्शनला रिॲक्शन येणारच...!

**(पान १ वरून)** आंदोलन कोणालाच अपेक्षीत नसते असंही मुख्यमंत्री म्हणाले. सरकार स्थापन झाल्यावर विरोधक म्हणाले हे सरकार घटनाबाह्य आहे, हे सरकार पडणार आहे. परंतू, असं झालं नाही. सरकार अधिक मजबूत होत गेलं. आम्ही बाळासाहेब यांचे विचार कधीही सोडले नाहीत असे मुख्यमंत्री म्हणाले. त्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडले त्यांना अशा प्रकारचा सामना करावा लागतो असा टोला मुख्यमंत्र्यांनी ठाकरेंना लगावला. सत्तेसाठी कुठलंही कॉम्प्रमाईज आम्ही विचारांशी करणार नाही असं मुख्यमंत्री म्हणाले. धनुष्यबाण वाचवण्यासाठी आम्ही हा निर्णय घेतलेला आहे असं ते म्हणाले.

**मातोश्री सोडून दिल्लीला लोटांगण, मुख्यमंत्र्यांचा ठाकरेंना टोला–** आज झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये स्ट्राईकरेट पाहिला तर लोकांची पसंती कोणाला आहेत ते पाहावं. ठाण्यातल्या लोकांना बरोबर औषध द्यायला सांगतो असे मुख्यमंत्री म्हणाले. हे लोक आम्हाला दिल्लीतलं सांगतात. आधी दिल्लीतली लोकं मातोश्रीमध्ये यायची आणि हे लोक आता मातोश्री सोडून दिल्लीला लोटांगण घालत असल्याचे म्हणत मुख्यमंत्र्यांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. आम्ही दिल्लीला जातो ते राज्यातील विकासासाठी जातो. आम्ही कुठलंही काम लपून-छपून करत नाही असे मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्रीपद मिळावं म्हणून आम्ही दिल्लीला जात नाही अस मुख्यमंत्री म्हणाले.

**बाळासाहेबांनी उद्धव ठाकरेंना जंगलात फोटोग्राफी करण्यासाठी पाठवलं असतं –** आता अनेक लोक बोलत फिरत आहेत की, मला मुख्यमंत्री करा. पण आम्ही तसं कधीच केलं नाही. मुख्यमंत्रीपदासाठी कधीही विचारांशी गद्दारी केली नाही असं मुख्यमंत्री म्हणाले. आजही ते ठाण्यातून दाढी बद्दल बोलले. परंतू, त्यांना दाढीची धास्ती आहे. त्यांना माहिती आहे याच दाढीने आपली गाडी खड्ड्यात घातलेली आहे. मिमिक्री करणं हेच काम त्यांना आता उरलेलं आहे. बाळासाहेब ठाकरे असताना त्यांनी अशा प्रकारचं काम केलं असतं तर बाळासाहेबांनी त्यांना जंगलात फोटोग्राफी करण्यासाठी पाठवलं असतं असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## उबाठा गटाच्या उपनेत्या अनिता बिर्जे यांचा शिवसेना शिंदे गटात पक्षप्रवेश

**(पान १ वरून)** चालणाऱ्या शिवसेनेला नवीन बळ मिळाले आहे. त्यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली आगामी काळात शिवसेना अधिक जोमाने काम करेल अशी अपेक्षा याप्रसंगी व्यक्त करतो.

यावेळी ठाणे जिल्हा महिला संघटका मीनाक्षी शिंदे, माजी नगरसेविका सुवर्णा करंजे, माजी नगरसेवक राम रेपाळे, माजी नगरसेवक रमाकांत मढवी, टेंभीनाका शिवसेना शाखेचे शाखाप्रमुख निखिल बुडजडे तसेच ठाणे शिवसेनेतील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## ठाण्यात आधार सहकारी पतपेढीची ३० वी वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**(पान १ वरून)** अँड. दिनेश पैठणकर साहेब नायब तहसीलदार ठाणे , प्रदीप शिंदे, किसनराव भोसले, तानाजी पानसकर, चंद्रकांत उंडे, ह भ प चंद्रकांत डुंबरे, संतोष मुळे, दादाभाऊ रेपाळे, अँड भाऊसाहेब शेळके, अँड विजय वाघमारे, शोभा वामन मॅडम, टी डी सी बँक मॅनेजर मृणाल मॅडम यासह अनेक ठेवीदार व सभासद यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तर सर्व सभासदांसाठी रविवारी १८-०८-२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता शुभश्री हॉल, अहिनवे वाडी फाटा, कल्याण नगर हायवे,ओतूर येथे सभासद प्रशिक्षण कार्यक्रम व मेळावा आयोजीत केल्याची माहिती अध्यक्ष साहेबांनी दिली तदनंतर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली, त्यानंतर संस्थे तर्फे अन्न दानाचा कार्यक्रम झाला..

## त्रुटी असलेल्या अर्जांबाबत संबंधित महिलांनी तात्काळ ....

**(पान १ वरून)** त्याचबरोबर जिल्हा प्रशासनाने त्रुटीयुक्त प्रकरणांनाही न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न सुरू केला आहे. यासाठी त्रुटी असलेल्या संबंधित महिलेने आपल्या नजीकच्या आशा सेविका/अंगणवाडी सेविका/ग्रामसेवक किंवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा व आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करून आपला अर्ज मंजूर करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



मिरा भाईंदरचा महाराजा म्हणून प्रसिद्ध सार्वजनिक श्रीगणेशाचे भव्य आगमन आणि रौप्य महोत्सवी वर्ष भाईंदर पूर्व फाटक रोड, महाराजा गल्ली, केबिन रोड, येथील मिरा भाईंदरचा महाराजा अशी ओळख असलेल्या सार्वजनिक श्री गणेशोत्सवाचे यावर्षी २५ वे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी श्रीगणेशाचा भव्य आगमन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावर्षी मंडळाने ३२ फूट उंचीच्या सुंदर श्री गणेश मूर्तीची स्थापना केली आहे, राहुल झुंजारराव हे मूर्तिकार व छायाचित्रकार आहेत. श्रीगणेश चतुर्थी ७ सप्टेंबर २०२४ रोजी असून मिरा-भाईंदर चा महाराजा या श्री सिद्धिविनायक मित्र मंडळ आयोजित सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळाने २५ व्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त श्री गणेश चतुर्थीच्या दिनांक ७ सप्टेंबर रोजी पासून अनंत चतुर्दशी म्हणजेच दि. १७ सप्टेंबर रोजी श्री गणेशाचे विसर्जनाच्या दिवसापर्यंत विविध कार्यक्रम ठेवले आहेत. व सुंदर देखावा सादर करण्यात येणार आहे. बालगोपालांसाठी करमणूक व विविध स्पर्धा, धार्मिक कार्यक्रम यांचे आयोजन केले असून, मंडळाचे अध्यक्ष महेश राजपूत , मंडळ प्रमुख महेंद्र दिलोड, उपाध्यक्ष केतन व्यास, मोहन गौड, कार्याध्यक्ष पुरू व्यास, चंद्रेश शेट्टी , खजिनदार गणेश नारकर , विरल वाघेला , सचिव अमित परमार उपसचिव दर्ष पारेख हे आपल्या मिरा-भाईंदरच्या महाराजा या सार्वजनिक श्री गणेशोत्सवाच्या २५ व्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्रकारे परिश्रम करीत आहेत.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## बांगलादेशातील अस्थैर्य अमेरिकेमुळे ?

बांगलादेशमध्ये गेल्या काही दिवसांपासून हिंसाचाराच्या घटना सुरु आहेत. हिंसाचाराच्या घटनानंतर शेख हसीना यांनी ५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान पदाचा राजीनामा देत देश सोडला. त्यानंतर बांगलादेशमध्ये नोबेल पारितोषिक विजेते मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वात अंतरिम सरकार स्थापन झाले. मात्र, यानंतरही अद्याप बांगलादेशमधील परिस्थिती पूर्ववत झालेली नाही. आता बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश ओबेदुल हसन यांनी देखील आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. बांगला देशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी देशातील अस्थैयाच्या परिस्थिबद्दल अमेरिकेला दोषी धरले आहे. अमेरिका बाहेरून बांगला देश अस्थिर करत आहे अशी टिकाच त्यांनी एका संदेशाद्वारे केली आहे. शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश ओबेदुल हसन यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलक विद्यार्थी आक्रमक झाले होते. तसेच आंदोलक विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयालाही घेराव घालण्याचा प्रयत्न करत सरन्यायाधीशांनीही पदाचा राजीनामा देण्याची मागणी करण्यात आली होती. सरन्यायाधीशांनी राजीनामा दिला नाही तर त्यांनाही खुर्चीवरून खाली खेचू, असा इशारा आंदोलकांनी दिला होता. यानंतर बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी राजीनामा दिला आहे. बांगला देशात आरक्षण विरोधी आंदोलकांनी अस्थैर्य माजवले आहे. या हिंसक आंदोलनात सुमारे ५०० ते ७०० लोकांचा मृत्यू झाला असण्याची शक्यता असून सार्वजनिक ठिकाणांचे नुकसान झाले आहे. बांगलादेशमध्ये गेल्या काही दिवसांपासून हिंसाचाराच्या घटना सुरु आहेत. दरम्यान अनेक घटना घडल्या असून अद्याप बांगलादेशमधील परिस्थिती पूर्व स्थितीत आलेली नाही. बांगलादेशचे माजी सरन्यायाधीश ओबेदुल हसन यांची एका वर्षापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, ओबेदुल हसन हे शेख हसीना यांच्याबरोबर संगनमत करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला होता. यानंतर सरन्यायाधीशांनी बैठक बोलावत राजीनामा दिला असल्याची घटना घडली. शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा देत देशातून पलायन केल्यानंतर मोहम्मद युनूस यांनी देशाच्या कारभाराची सूत्र आपल्या हातात घ्यावी, अशी मागणी बांगलादेशातील विद्यार्थी आंदोलकांकडून करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या मागणीनंतर मी सरकारचा सल्लागार म्हणून काम करेन, अशी ग्वाही मोहम्मद युनूस यांनी दिली होती. त्यानंतर मोहम्मद युनूस हे परदेशातून बांगलादेशमध्ये परतले होते. यानंतर त्यांनी अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून शपथ घेतली. दरम्यान, बांगलादेशमधील लष्कराने मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरीम सरकारला पूर्ण समर्थन देण्याचा निर्णय घेतला असला तरी देशात निर्माण झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर अनेक आव्हानांचा सामना मोहम्मद युनूस यांच्या अंतरीम सरकारला करावा लागणार आहे. त्यामुळे मोहम्मद युनूस यांच्यासाठी हे सरकार चालवणे आव्हानात्मक असणार आहे. शेख हसीना यांनी बांगलादेशच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन देशातून पलायन केलं आहे. त्या सध्या भारतात असून त्यांनी बांगलादेशातील अराजकतेला अमेरिका जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. अमेरिकेनेच त्यांना सत्तेवरून पायउतार होण्यास भाग पाडल्याचे वक्तव्य केले आहे. शेख हसीना यांनी अमेरिकेला सेंट मार्टिन बेट न दिल्यामुळे अमेरिकेने त्यांना सत्तेवरून हटवण्याची योजना आखली होती, असेही कारण हसीना यांनी दिले आहे. बांगलादेशकडून सेंट मार्टिन बेट घेऊन तिथे नौदलाचे व लष्करी तळ उभारण्याची अमेरिकेची योजना होती. ज्याद्वारे अमेरिकेला बंगालच्या उपसागरावर स्वतःचा प्रभाव निर्माण करता आला असता. अमेरिकेला सेंट मार्टिन बेट हवे होते, मात्र हसीना यांनी ते दिले नाही. परिणामी अमेरिकेने त्यांना सत्तेवरून हटवण्यासाठी वेगवेगळ्या राजकीय चाली खेळल्या आणि त्यात ते यशस्वी झाले, असे शेख हसीना यांनी त्यांच्या निकटवर्तीयांच्या माध्यमातून पाठवलेल्या संदेशात म्हटले आहे.


## नवी मुंबई महानगरपालिका

**सार्व.आरोग्य अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्र.-नमुंमपा/कार्यकारी अभियंता(पाणीपुरवठा)/03/2024**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | दिघा विभागातील सुभाषनगर येथील जलउंदचन केंद्रावरील MIDC पाईप लाईनवर बुस्टर पंप बसविणे. | 4,20,967/- |
| 2 | दिघा विभागातील दिघा मेन व सुभाषनगर येथे 150 मी मी व्यासाचे जलमापक(मिटर)बसविणे व पाणी पुरवठा विषयक कामे करणे. | 4,20,717/- |
| 3 | दिघा विभागातील संजयगांधीनगर,नामदेवनगर येथे पाणी पुरवठा सुरळीत करणेकरीता व्हॉल्व,रोड बॉक्स् इ.बसविणे. | 3,98,151/- |
| 4 | दिघा विभागातील दिघा पुर्व सार्वजनिक बैठे शौचालय येथे नवीन बोरवेल मारून शौचालयास पाणी पुरवठा सुरळीत करणे. | 3,82,068/- |
| 5 | दिघा विभागातील सुभाषनगर येथे मेन एम.आय.डी.सी. जलवाहीनीवर जलमापक बसविणे. | 3,03,000/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि.12/08/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-

**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)**

**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/191/2024 नवी मुंबई महानगरपालिका**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

मुख्य लेखा विभाग

मुदत ठेवी ठेवणेसाठी व्याजदर मागविणेबाबत

**ठाणे स्मार्ट सिटी लि.** अंतर्गत विविध खात्यातील च्या खात्यांमधील रक्कमेची गुंतवणूक करणेसाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील फक्त राष्ट्रियकृत बँकांकडून व्याजदर मागविणेत येत आहेत. तरी, ठाणे महापालिका क्षेत्रातील राष्ट्रियकृत बँकांनी व्याजदर, मुदतपूर्ण रक्कम, ग्राहय दिनांक इ, माहिती ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील तक्त्यानुसार व्याजदर नमूद करुन मुख्य लेखा अधिकारी यांचे नावे मुख्य लेखा विभाग दुसरा मजला ,ठाणे महापालिका मुख्यालय, पाचपाखाडी ठाणे येथे दि.१२/०८/२०२४ रोजी पर्यंत देऊन, अथवा cafoinvest@thanecity.gov.in या email वर उपरोक्त तारखेस व्याजदर देण्यात यावेत, तदनंतर प्राप्त व्याजदराच्या पत्राचा विचार करण्यांत येणार नाही. अधिक माहिती www.thanecity.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/मुलेविअ/२६६/२०२४-२५
दि:०९.०८.२०२४

सही/-
मुख्य वित्त अधिकारी (CFO
ठाणे स्मार्ट सिटी लि.

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**


जा. क्र.
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय.
ठाणे विभाग, ठाणे
मजला क्र. ३ ते ६, वेस्ट व्ह्यू इमारत,
राम मारुती रोड, गजानन महाराज
मंदिराजवळ, ठाणे (प)-४००६०२.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे

जाहीर नोटीस

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२- नियम ७ व ७ओ वाचावे)

बदल अहवाल क्रमांक : ACC / III / 998 / 2024

ज्याअर्थी, **Chandanvadi Shwetamber Murtipujak Jain Trust E-1742** या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त **Mahendrakumar V. Shah** यांनी **विश्वस्त मंडळ** यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक ०८/०८/२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक **१३/०९/२०२४** रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक **०९** रोजी माहे **ऑगस्ट** सन २०२४ माझ्या सहीनिशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे

जा. क्र.
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय.
ठाणे विभाग, ठाणे
मजला क्र. ३ ते ६, वेस्ट व्ह्यू इमारत,
राम मारुती रोड, गजानन महाराज
मंदिराजवळ, ठाणे (प)-४००६०२.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे

जाहीर नोटीस

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२- नियम ७ व ७ओ वाचावे)

बदल अहवाल क्रमांक : ACC / III / 995 / 2024
E-1742/Thane

ज्याअर्थी, **Chandanvadi Shwetamber Murtipujak Jain Trust** या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त **Mahendrakumar Vadilal Shah** यांनी **विश्वस्त मंडळ** यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक ०८/०८/२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत धर्मादाय उप आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक १३/०९/२०२४ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक **०९** रोजी माहे **ऑगस्ट** सन २०२४ माझ्या सहीनिशी व धर्मादाय आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे

## मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय
## आचोळे पोलीस ठाणे

पत्ता - एव्हरशाईन सिटी, शेवटचाथांबा, पाण्याची टाकीजवळ, नालासोपारा (पूर्व), ता. वसई जिल्हा पालघर पिन नं.४०१२०९,

E-Mail ID: pi.achole.mb-vv@mahapolice.gov.in
Gmail- acholepstn@gmail.com
Phone no. 0250-2990955
Website-www.mbvv.mahapolice.gov.in

जावक क्रमांक :- ७५७२/२०२४ दि. ०७/०८/२०२४

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत आचोळे पोलीस ठाणे बेवारस / क्षतीग्रस्त वाहनाचे लिलावा बाबत आचोळे पोलीस ठाणे नालासोपारा पूर्व मधील एकुण १८ मोटर सायकल व १ आटो रिक्षा असे एकुण १९ बेवारस/क्षतीग्रस्त दर्शविल्या प्रमाणे वाहनाचे भंगार दिनांक १९/०८/२०२४ रोजी ११.०० वाजता प्रथम लिलाव पोलीस ठाणे आचोळे नालासोपारा पूर्व येथे विक्री करण्यात येणार आहे. स्व:ताची माहीती देणे आवश्यक असून लिलावात भाग घेण्यापुर्वी रक्कम रूपये ५०००/- (पाच हजार) राष्ट्रीयकृत बँकेच्या डि.डि. व्दारे जमा करणे आवश्यक आहे. (कोणत्याही परिस्थिती रोख रक्कम अथवा चेक स्विकारले जाणार नाही.)

सदर लिलाव करिता करीता लिलावात भाग घेण्याऱ्यांनी सदर वाहनाचे करण्यात आलेल्या मुल्यांकन च्या वरील दर पत्रक सादर करावयाची आहेत. त्यापैकी सर्वात जास्त दरपत्रक ज्याचे असेल ते स्विकृत करण्यात येईल. लिलाव प्रक्रिया होताच अनामत रक्कम परत करण्यात येईल. लिलाबा संदर्भात असणाऱ्या अटी व शर्ती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व आचोळे पोलीस ठाणे च्या नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. भंगार लिलाव कोणतेही कारण न देता ऐनवेळी स्थगीत करणे किंवा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

शिक्का

सही/-
(विजय चव्हाण)
पोलीस निरीक्षक (प्रशा.व गुन्हे)
आचोळे पोलीस ठाणे

**PUBLIC TRUSTS REGISTRATION OFFICE**
**THANE REGION, THANE**
Address: West View Building, Ram Maruti Road,
Opp. Gajanan Maharaj Mandir, Thane (West)-400 602.

**PUBLIC NOTICE OF INQUIRY**

In the matter of **"CHANDANVADI SHWETAMBER MURTIPUJAK JAIN TRUST"**
Change Report No.: ACC-III/992/24
Address: Dipmoti, Agraroad, Shahapur Thane - 421 601.
B.P.T. Registration No: E-1742/THANE.
Applicant- Mahendrakumar Vadilal Shah.

All concerned having interest-

WHEREAS in the above application for registration under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 an inquiry is to be made of the said act, on the Following points by Assistant Charity Commissioner Thane Region, Thane.

Weather Below mentioned property is the property of the trust and could be registered in the name of the Trust?

**IMMOVABLE PROPERTY:**

Open Plots of Land bearing Survey No. 27, Plot No. 13 and Plot No. 14 situated At. Village Mauje Shahapur, Taluka - Shahapur District - Thane, Sub - Register Murbad / Shahapur.

| | |
|---|---|
| Plot No. 13- Layout Area 280.00 Sq. Mtrs, Admeasuring Area 264.00Sq. Mtrs. | Plot No. 14- Layout Area 280.00 sq. mtrs, Admeasuring area 281.00 sq. mtrs. |
| Bounded as under :-<br>Towards the East: Land of Plot No. 12.<br>Towards the West: Land of Plot No. 14<br>Towards the South: Road under Layout<br>Towards the North: Survey No. 114-A | Bounded as under :-<br>Towards the East: Land of Plot No. 13<br>Towards the West: Land of Plot No. 15<br>Towards the South: Road Under Layout<br>Towards the North: Survey No. 114-A |

Purchase Consideration all Two Plots:

| | | |
|---|---|---|
| Purchase Value | Rs. | 1,40,000/- |
| Stamp Duty | Rs. | 5,600/- |
| Registered Fees | Rs. | 1,400/- |
| Other Charges | Rs. | 75/- |
| Total Cost: | Rs. | 1,47,075/- |

This is to call upon you to submit your objections, if any, in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner Thane Region, Thane at the above address within 30 days from the date of publication of this notice failing which the change report will be decided and disposed of on its own merits.

Given under my hand and seal of the Assistant Charity Commissioner, Thane Region, Thane.

This 09 Day of Aug 2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts Registration Office
Thane Region, Thane.

**PUBLIC TRUSTS REGISTRATION OFFICE**
**THANE REGION, THANE**
Address: West View Building, Ram Maruti Road,
Opp. Gajanan Maharaj Mandir, Thane (West)-400 602.

**PUBLIC NOTICE OF INQUIRY**

In the matter of **"CHANDANVADI SHWETAMBER MURTIPUJAK JAIN TRUST"**
Change Report No.: ACC-III/993/24
Address: Dipmoti, Agraroad, Shahapur Thane - 421 601.
B.P.T. Registration No: E-1742/THANE.
Applicant- Mahendrakumar Vadilal Shah.

All concerned having interest-

WHEREAS in the above application for registration under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 an inquiry is to be made of the said act, on the Following points by Assistant Charity Commissioner Thane Region, Thane.

Weather Below mentioned property is the property of the trust and could be registered in the name of the Trust?

**IMMOVABLE PROPERTY:**

Open Plots of Land bearing Survey No. 27, Plot No. 15, Plot No. 16 and Plot No. 17 situated At. Village Mauje Shahapur, Taluka - Shahapur District - Thane, Sub - Register Murbad / Shahapur.

| | | |
|---|---|---|
| Plot No. 15- Layout Area 320.00 Sq. Mtrs, Admeasuring Area 317.75 Sq. Mtrs. | Plot No. 16- Layout Area 300.00 sq. mtrs, admeasuring area 305.00 sq. mtrs. | Plot No. 17:- Layout Area 280.00 sq. mtrs, admeasuring area 288.00 sq. mtrs. |
| Bounded as under :-<br>Towards the East: Land of Plot No. 14.<br>Towards the West: Land of Plot No. 16/17<br>Towards the South: Road under Layout<br>Towards the North: Survey No. 114-A | Bounded as under :-<br>Towards the East: Land of Plot No. 15<br>Towards the West: Road Under Layout<br>Towards the South: Land of Plot No. 17<br>Towards the North: Survey No. 114-A | Bounded as under-<br>Towards the East: Land of Plot No. 15<br>Towards the West: Road Under Layout<br>Towards the South: Road Under Layout<br>Towards the North: Land of Plot No. 16 |

Purchase Consideration all Three Plots:

| | | |
|---|---|---|
| Purchase Value | Rs. | 2,28,000/- |
| Stamp Duty | Rs. | 9,120/- |
| Registered Fees | Rs. | 2,280/- |
| Other Charges | Rs. | 90/- |
| Total Cost: | Rs. | 2,39,490/- |

This is to call upon you to submit your objections, if any, in the matter before the Ld. Assistant Charity Commissioner Thane Region, Thane at the above address within 30 days from the date of publication of this notice failing which the change report will be decided and disposed of on its own merits.

Given under my hand and seal of the Assistant Charity Commissioner, Thane Region, Thane.

This 09 Day of Aug 2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts Registration Office
Thane Region, Thane.

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार – २ नायब सुभेदार –
■ क्रीडा पात्रता: ऍथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## मध्य रेल्वे

■ जागा : २४२४
■ पदाचे नाव: अप्रेंटिस
मुंबई
भुसावळ
पुणे
नागपूर
सोलापूर
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये NCVT (Fitter/Welder / Carpenter/ Painter/Tailor/Electrician/ Mechanist / PASAA / Mechanical Diesel / Lab Assistant/Turner/ Electronics Mechanic/Sheet Metal Worker / Winder / MMTM/Tool Die Maker/Mechanical Motor Vehicle/IT Electronic System Maintenance)
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: मध्य रेल्वे
■ Fee: General/OBC: 100/- SC/ ST/PWD/EWS/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://cr.indianrailways.gov.in/

## पश्चिम–मध्य रेल्वे

■ जागा : ३३१७ जागा
■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
■ शैक्षणिक पात्रता: मेडिकल लॅब टेक्निशियन: (i) १२वी उत्तीर्ण (Physics, Chemistry Biology) (ii) NCVT/SCVT. उर्वरित ट्रेड: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: ०५ ऑगस्ट २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: पश्चिम-मध्य रेल्वे
■ Fee: General/ OBC:141/- SC/ST/ PWD/महिला: ४१/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://wcr.indianrailways.gov.in/



## होमगार्ड भरती २०२४

■ जागा : ९०००
पदाचे नाव :
१ होमगार्ड
■ जिल्हानिहाय रिक्त पदे:
अ.क्र. जिल्हा पद संख्या
१ सातारा ४९५
२ नांदेड ३२५
३ रत्नागिरी ४५८
४ जळगाव ३२५
५ चंद्रपूर ८२
६ यवतमाळ १२१
७ सिंधुदुर्ग १७७
८ धुळे १३८
९ हिंगोली ७५
१० अमरावती १४१
११ बीड २३४
१२ धाराशिव २३७
१३ वाशिम ५९
१४ भंडारा ३१
१५ नंदुरबार ७९
१६ गडचिरोली १४१
१७ रायगड ३१३
१८ लातूर १४३
१९ पुणे १८००
२० सांगली ६३२
२१ नाशिक १३०
२२ कोल्हापूर २८७
२३ वर्धा ७६
२४ छ. संभाजीनगर ४६६
२५ नागपूर ८९२
२६ जालना १९५
२७ अकोला १५१
२८ अहमदनगर ३५९
२९ बुलढाणा २४८
३० बृहन्मुंबई –
■ शैक्षणिक पात्रता: किमान १०वी उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता:
उंची छाती धावणे
पुरुष १६२ से.मी. ७६ सेमी व फुगवून ५ सेमी जास्त १६०० मीटर
महिला १५० से.मी. – ८०० मीटर
■ वयाची अट: २० ते ५० वर्षे.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ महत्त्वाच्या तारखा:
अ. क्र. जिल्हा Online अर्ज करण्याची शेवटची तारीख
१ सातारा ३१ जुलै २०२४
२ नांदेड १४ ऑगस्ट २०२४
३ रत्नागिरी १४ ऑगस्ट २०२४
४ जळगाव १४ ऑगस्ट २०२४
५ चंद्रपूर १० ऑगस्ट २०२४
६ यवतमाळ १७ ऑगस्ट २०२४
७ सिंधुदुर्ग १४ ऑगस्ट २०२४
८ धुळे १४ ऑगस्ट २०२४
९ हिंगोली १४ ऑगस्ट २०२४
१० अमरावती ०५ ऑगस्ट २०२४
११ बीड १६ ऑगस्ट २०२४
१२ धाराशिव १४ ऑगस्ट २०२४
१३ वाशिम १४ ऑगस्ट २०२४
१४ भंडारा १६ ऑगस्ट २०२४
१५ नंदुरबार १४ ऑगस्ट २०२४
१६ गडचिरोली १४ ऑगस्ट २०२४
१७ रायगड १६ ऑगस्ट २०२४
१८ लातूर १६ ऑगस्ट २०२४
१९ पुणे ११ ऑगस्ट २०२४
२० सांगली १४ ऑगस्ट २०२४
२१ नाशिक १४ ऑगस्ट २०२४
२२ कोल्हापूर १४ ऑगस्ट २०२४
२३ वर्धा १५ ऑगस्ट २०२४
२४ छ. संभाजीनगर १४ ऑगस्ट २०२४
२५ नागपूर २४ ऑगस्ट २०२४
२६ जालना १७ ऑगस्ट २०२४
२७ अकोला १७ ऑगस्ट २०२४
२८ अहमदनगर १७ ऑगस्ट २०२४
२९ बुलढाणा १७ ऑगस्ट २०२४
३० बृहन्मुंबई १४ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php




## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

### भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

# 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत अर्ज केलेल्या महिलांनी आपले बँक खाते आधारकार्डशी संलग्न करावे

## त्रुटी असलेल्या अर्जांबाबत नमुंमपा मदत केंद्रे, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन

नवी मुंबई : 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज केलेल्या महिलांनी आपले बँक खाते आधार कार्डशी संलग्न (आधार सीडेड) असल्याची त्वरित खात्री करून घ्यावी आणि तसे संलग्न केलेले नसल्यास संबंधित बँकेत जाऊन बँक खाते आधार कार्डशी संलग्न करण्याची कार्यवाही त्वरित करून घ्यावी. त्याचप्रमाणे अर्जामध्ये त्रुटी असलेल्या अर्जांच्या बाबत त्या महिलांनी नमुंमपा विभाग कार्यालये अथवा अंगणवाडी सेविका वा आशा वर्कर किंवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी त्वरित संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज केला तरी सर्व पात्र लाभार्थ्यांना जुलै २०२४ पासूनचा दरमहा रू.१५००/- लाभ मिळणार आहे. तसेच १ जुलै ते ३१ जुलै, २०२४ पर्यंत अर्ज केलेल्या पात्र लाभार्थींना ऑगस्ट महिन्यात डिबीटीव्दारे थेट त्यांच्या बँक खात्यात जुलै, ऑगस्ट अशा २ महिन्यांचा लाभ जमा होणार आहे. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान प्राप्त अर्जांची छाननी होऊन सप्टेंबर, २०२४ अखेरपर्यंत पात्र लाभार्थींना योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थी महिलांच्या आधार संलग्न (आधार सीडेड) बँक खात्यात दरमहा रू.१५००/- इतकी रक्कम डीबीटी व्दारे जमा केली जाणार आहे. यासाठी संबंधित महिलेचे बँक खाते आधार संलग्न (आधार सीडेड) असणे आवश्यक आहे.

जमा करण्यात आलेल्या त्रुटीयुक्त अर्जांनाही न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न सुरू करण्यात आला असून यासाठी त्रुटीबाबतचा संदेश प्राप्त झालेल्या संबंधित महिलेने आपल्या नजिकच्या नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालयाशी अथवा अंगणवाडी सेविका, आशा वर्कर अथवा ज्यांच्याकडून अर्ज भरुन घेतला असेल त्यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा व आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करून आपला अर्ज मंजूर करून घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत 'नारी शक्ती दूत' या मोबाईल ॲपवरुन ज्यांनी स्वतःचे वा अन्य लाभार्थींचे अर्ज दाखल केले असतील अशा सर्व महिला, समुह संघटक, बचतगट अध्यक्ष / सचिव, गृहिणी, अंगणवाडी सेविका / मदतनीस, विभाग अधिकारी, सेतू सुविधा केंद्र, बालवाडी सेविका, आशा सेविका, पर्यवेक्षिका (मुख्य सेविका), सीएमएम तसेच मदत कक्षप्रमुख यांना आवाहन करण्यात येते की, नारीशक्ती दूत ॲपमधील आपल्या प्रोफाईलमध्ये लॉगीन करून 'यापूर्वी केलेले अर्ज' या टॅबवर क्लिक करून आपल्याव्दारे दाखल (सबमिट) केलेल्या संपूर्ण अर्जांची यादी आपण पाहू शकता. त्यामध्ये 'मंजूर', 'नामंजूर', 'प्रलंबित', 'नाकारलेले' असे शेरे आणि लाभार्थीचे नाव, मोबाईल नंबरसुध्दा पाहता येतील.

यास्तव सर्व संबंधितांनी 'नामंजूर' अर्ज असलेल्या लाभार्थींना संपर्क करून 'अंशतः अर्ज रद्द होण्याचे कारण' या टॅबवर बघून त्याप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करावी. याकरिता 'संपादित अर्ज' टॅबवर जाऊन यापूर्वी केलेल्या नोंदी चुकीच्या असतील तर त्या दुरुस्त करून घ्याव्यात व 'अर्ज दाखल)' करावा. यामध्ये अर्ज फक्त एकदाच संपादित करता येईल याची कृपया नोंद व दक्षता घ्यावयाची आहे. तरी वरीलप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता त्वरित करण्यात यावी, जेणेकरून या योजनेचा लाभ पात्र महिलांना मिळू शकेल असे आवाहन करण्यात येत आहे.

भाजपने युती धर्म पाळुन माकड चाळे करणाऱ्यांची हकालपट्टी केली पाहिजे : राजाभाई केणी

# पेणमध्ये पदाधिकाऱ्यांवर कारवाई, अलिबागमध्ये भाजपची कारवाई का नाही : आ. महेंद्र दळवी

पेण : अलिबाग मुरुड रोहा पेण सुधागड पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन अलिबाग येथे करण्यात आले होते यावेळी आम्ही युती धर्म पाळतो पण भाजप युती धर्म पाळत नाही. भाजप पदाधिकारी बॅनरबाजी करून आपणच आमदारकीचे उमेदवार आहोत असे भासवत आहेत पेण मतदारसंघात भाजपने प्रसाद भोईर यांच्यावर कारवाई केली पण अलिबाग मध्ये छोटमशेठवर भाजपच्या पक्ष श्रेष्ठीनी मात्र कारवाई केली नाही. यामुळे शिवसेनेमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे आम्ही केवळ पक्षाचा आदेश पाळतो तुम्ही ही युतीचा धर्म पाळा नाहीतर अलिबाग पेण मतदार संघात शिवसेनेची ताकद जास्त आहे आम्ही उमेदवार उभे करू, असा इशारा आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी भाजपला दिला.



> आज नागपंचमीचा सण असतानाही मोठ्या संख्येने आढावा बैठकीसाठी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहिले आहेत यामुळे आमदार महेंद्र दळवी यांचे प्रेम आणि ताकद दिसून येत आहे, केवळ वडिलांची पुण्याई म्हणुन विरोधक राजकरण करत आहेत आता कटोरा घेऊन दिल्लीला फेऱ्या माराव्या लागत आहेत,तुम्ही एवढ्या वर्ष डसणाऱ्या नागाला दूध पाजले पण महेंद्र दळवी यांनी डसणाऱ्या सापाला आता मातीत लोळवल आहे आता घाबरायचे कारण नाही.
>
> **-प्रवक्त्या शीतल म्हात्रे**

यावेळी आमदार महेंद्रशेठ दळवी, संपर्कप्रमुख प्रकाश देसाई, जिल्हा प्रमुख राजाभाई केणी, शिवसेना नेत्या मीनाताई कांबळे, प्रवक्त्या शीतलताई म्हात्रे, संजीवनी नाईक, मंगेश दांडेकर मुरुड, दिपश्री,रोहा तालुका प्रमुख मनोज शिंदे, दिपक रानवडे, अनंत गोंधळी, पेण तालुका प्रमुख तुषार मानकावळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना अलिबाग मतदार संघातून लोकसभेला ४० हजाराच्या मताधिक्याने महायुती पक्षाचे युतीधर्म पाळुन खासदार सुनील तटकरे यांना निवडून आणले. पण आता भाजपचे पदाधिकारी आम्हीच भावी आमदारकीचे उमेदवार असल्याचे बोलत आहेत, असे असताना भाजपने पेणमध्ये प्रसाद भोईर यांच्यावर कारवाई केली, पण अलिबागमध्ये भाजपची कारवाई का करण्यात आली नाही, आम्ही प्रामाणिक प्रयत्न केले म्हणुन आज आमदार आहोत तर आजही शेकापचे दिग्गज नेते आमच्या संपर्कात असल्याचे आमदार दळवी यांनी सांगितले तर येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत ५० काय १ लाखाच्या मताधिक्याने कसे निवडून येणार याकडे लक्ष आहे,तुमचे चांगले सहकार्य येणाऱ्या निवडणुकीत मिळेल, शिवसेनेचे कार्यकर्ते सुज्ञ आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची काम करण्याची पद्धत आणि मदतीचा हात यामुळे शिवसेनेची ताकद दिवसेंदिवस वाढत आहे.

यावेळी जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांनी भाजप पदाधिकाऱ्यांनी माकड चाळे बंद करावे असा इशारा देत माकड चाळे करणाऱ्या प्रसार भोईर व छोटमशेठ भोईर हे भावी आमदार असल्याचे बॅनर बाजी करत आहेत हे वरिष्ठांच्या लक्षात आल्याने पेण मतदार संघात प्रसाद भोईर यांनी पदावरून हकालपट्टी केली पण अलिबागमध्ये माकड चाळे करणाऱ्या छोटमशेठ भोईर यांनी पदावरून हकाल पट्टी कधी करणार,४० हजार कार्यकर्ते पेण विधानसभेमध्ये आहे तसेच अलिबग पेण पनवेल उरण मध्ये शिवसेनेची ताकद जास्त असल्याने भाजपने युती धर्म पाळुन माकड चाळे करणाऱ्यांची हकालपट्टी केली पाहिजे, असा इशारा राजाभाई केणी यांनी दिला.

# विनेश फोगाटला रौप्यपदक मिळणार? आता मंगळवारी फैसला



भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाटला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १०० ग्रॅम वजन वाढल्याने अगदी शेवटच्या क्षणी अपात्रतेचा सामना करावा लागला. यामुळे तिचे पदकाचे स्वप्न भंगले. त्यानंतर तिने कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्टमध्ये अर्ज केला. यावरील सुनावणी पार पडली असून, या संदर्भातील निकाल पुन्हा एकदा राखून ठेवण्यात आला आहे. विनेश फोगाट हिच्या अर्जावर आता मंगळवार, १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता निर्णय देण्यात येणार आहे अशी माहिती भारतीय ऑलिंपिक संघाने दिल्याचे दिले आहे.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये वजन वाढल्यामुळे विनेश फोगटला संपूर्ण स्पर्धेतूनच अपात्र ठरविण्यात आले. यानंतर दुसऱ्याच दिवशी आज विनेश फोगटने निवृत्तीची घोषणा केली. दरम्यान, विनेशने बुधवारी ५० किलो गटाच्या ऑलिम्पिक फायनलमधून तिला अपात्र ठरवल्याच्या कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट्स (सीएएस)कडे अपील केले होते. तिने या स्पर्धेत संयुक्त रौप्यपदक देण्याची मागणी केली होती.

उपांत्य फेरीत विनेशकडून पराभूत झालेल्या क्युबाची कुस्तीपटू युस्नेलिस गुझमन लोपेझने अंतिम फेरीत स्थान मिळाले. अमेरिकन सारा न हिल्डेब्रँडने हा सामना जिंकून सुवर्णपदक जिंकले. तर उपांत्य आणि अंतिम फेरीत पराभव होवूनही क्युबाची कुस्तीपटू युस्नेलिस गुझमन लोपेझने हिला रौप्य पदकमिळाले होते

ऑलिम्पिक खेळांदरम्यान किंवा उद्घाटन समारंभाच्या १० दिवसांच्या कालावधीत उद्भवलेल्या कोणत्याही विवादाच्या मध्यस्थीद्वारे निराकरण करण्याचे काम कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट्स (सीएएस) ही आंतरराष्ट्रीय संस्था पाहते. १९८४ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे मुख्यालय स्वित्झर्लंडमधील लॉसने येथे आहे. CAS चे काम क्रीडा विवाद, विशेषत: शिस्तभंग प्रकरणे आणि डोपिंग प्रकरणांमध्ये निष्पक्ष आणि तटस्थ निर्णय देणे असे आहे. त्याचे निर्णय अनिवार्य आहेत आणि ती क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च न्यायालयीन संस्था मानली जाते.

विनेश फोगाट पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीतून अपात्र ठरली होती. सुवर्णपदकाच्या लढतीच्या दिवशी सकाळी तिचे वजन ५०.१ किलो होते. पात्रतेच्या निकषांपेक्षा तिचे वजन १०० ग्रॅम होते. फोगटची अपात्रता ही प्रत्येक भारतीयासाठी एक मोठा धक्का होता. सुवर्णपदकाच्या एका रात्री अगोदर विनेशने उपांत्य फेरीनंतर मिळवलेले २.७ किलो वजन कमी करण्यासाठी सराव केला. भारताचे मुख्य वैद्यकीय अधिकारी दिनशॉ पार्डीवाला यांनी स्पष्ट केले की,. पॅरिसच्या उष्णतेमध्ये सौनामध्ये वेळ घालवण्यासाठी विनेशने वजन कमी करण्यासाठी अथक परिश्रम केले होते. जेव्हा सर्व काही अयशस्वी झाले, तेव्हा प्रशिक्षकांनी तिचे केस कापण्याचा प्रयत्न केला; परंतु तरीही वजन ५० किलोग्रॅमपर्यंत पोहोचू शकले नाही. यामुळे अखेर तिला पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आले.




# 'थंगालान २' बद्दल चियान विक्रमचा मोठा खुलासा

तमिळ अभिनेता चियान विक्रमचा बहुप्रतिक्षित आगामी 'थंगालान' चित्रपट येत्या १५ ऑगस्ट रोजी चाहत्यांच्या भेटीस येणार आहे. लवकरच सिनेमागृहात चित्रपट पाहायला मिळणार असल्याने याबद्दल चाहत्यांमध्ये खूपच क्रेझ पाहायला मिळत आहे. या चित्रपटात चियान विक्रमने मुख्य भूमिकेत दमदार अभिनय साकारला आहे. दरम्यान एका मुलाखतीत चियानने या चित्रपटाच्या सिक्केलबद्दल मोठी अपडेटस दिली आहे.

चियान विक्रमने नुकतेच एका मुलाखतीत 'थंगालान' चित्रपटाच्या सिक्केलबद्दल माहिती देताना सांगितले आहे की, 'थंगालान'चे सिक्केल बनवू शकतो. निर्माते एकतर चित्रपटाचा प्रीक्कल किंवा सिक्केल तयार करू शकतात. तर या चित्रपटातील छोट्या- मोठ्या कथाचा आधार घेवून नवीन अनेक चित्रपट तयार होवू शकतात. कारण, या चित्रपटाशी अनेक कथा जोडल्या गेल्या आहेत. त्यानंतर विक्रम गंमतीने म्हणाला की, 'थंगालान' मधील एक-दोन नव्हे तर तीन-चार वेगवेगळ्या कथावर आधारित चित्रपट निर्माण होवू शकतात. मात्र, निर्मात्यांनी अद्याप या चित्रपाच्या सिक्केलबद्दल काहीही ठोस माहिती सांगितलेली नाही.

'थंगालान' चित्रपटाची कथा कोलार गोल्ड फील्ड्स बद्दल आहे. ब्रिटिशांनी कोलार गोल्ड फील्ड सुमारे २०० वर्षांपूर्वी शोधून काढले. पण त्याचा उपयोग त्यानी आपल्या फायद्यासाठी केला. या चित्रपटाची कथा घत्र्क्र च्या जमिनीवर राहणाऱ्या आदिवासी लोकांभोवती फिरते. चित्रपटात ब्रिटिशांनी त्यांची संसाधने कशी हिसकावून घेतली हेही दाखविले आहे.

'थंगालान'मध्ये अभिनेता चियान विक्रम मुख्य भूमिकेत आहे. त्यांच्याशिवाय चित्रपटात अभिनेत्री मालविका मोहनन, पार्वती थिरुवोथू, पशुपती आणि डॅनियल कॅल्टीगारोन दिसणार आहेत. या पीरियड क्शन चित्रपटाचे दिग्दर्शन पा रणजीत यांनी केलं आहे. हा चित्रपट येत्या १५ ऑगस्ट २०२४ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# निवडणूक आयोग म्हणजे सत्ताधाऱ्यांची खाजगी यंत्रणा

## शिवसेना नेते राजन विचारे यांचा घणाघात

## लोकसभा निवडणुकीत निवडणुक अधिकाऱ्यांनी सत्ताधाऱ्यांच्या दबावापोटी काम केले

ठाणे (गणेश भोईटे) : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी खासदार राजन विचारे यांनी लोकसभेच्या पराभवानंतर आपल्या पराभवाची कारणे शोधली असता त्यावेळी असे निदर्शनास आले की, जनमत आपल्या बाजूने असताना कटकारस्थाने करून पैसा व सत्तेचा गैरवापर करून निवडणूक यंत्रणांमध्ये आपल्या मर्जीतल्या अधिकारांच्या नेमणुकांकरून सत्ताधारी आपली पोळी भाजून घेत असल्याचा गंभीर आरोप खा. विचारे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिष्टमंडळासोबत काल रात्री उशिरा जिल्हाधिकारी व निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत केला आहे.



### बोगस मतदानाला प्रोत्साहन देऊ नका दोषीवर कार्यवाही करा

दुबार नावे वगळण्यासाठी वारंवार पत्र देवूनसुद्धा दि. ०६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या मतदार यादीमध्ये दुबार मतदारांचा आकडा पुन्हा वाढल्याने काल रात्री उशिरा दुबार नावांच्या मतदार याद्या जिल्हाधिकारी व सर्व निवडणूक अधिकाऱ्यांच्या समवेत त्यांना सुपूर्त केल्या. नुकताच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात झालेल्या बोगस मतदानाला आळा बसावा यासाठी येणारी विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन दुबार नावे वगळावी अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच एखाद्या यादीमधील अपरिचित व्यक्ती जी कोणी तेथे राहत नसतील तर त्यांना नोटीसा पाठवून त्यांचे नाव कोणत्या यादीमध्ये ठेवावे यावर तातडीने कार्यवाही करावी अशीही मागणी करण्यात आली. तसेच दि. ६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रारूप प्रसिद्ध केलेली यादी ची फोटो सहित सॉफ्ट कॉपी दिल्यास यातील पुन्हा दुबार नावे शोधण्यास बीएलए यांना व इतर नागरिकांना ही ओळखणे सोपे जाईल. तसेच वगळण्यात येणारी नावे पुन्हा नोदाविण्यास मदत करणाऱ्या दोषीवर कार्यवाही करा अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांनी सर्व विधानसभेच्या अधिकाऱ्यांना या याद्यांमधील दुबार नावांची वोटर आयडी नंबर तपासून प्रत्यक्ष जागेवर ती व्यक्ती तिथे राहते कि नाही याची शहानिशा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच या प्रक्रियेमधील दोन दिवसाचा कालावधी अधिक वाढवावा व आपली यंत्रणा सज्ज करा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यावेळी संपर्क प्रमुख नरेश मणेरा, जिल्हाप्रमुख विठ्ठल मोरे, द्वारकानाथ भोईर, प्रभाकर म्हात्रे, केदार दिघे, शहरप्रमुख उपशहर प्रमुख, सचिव व इतर शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोग वारंवार असे सांगते की, निवडणूक प्रक्रिया सपूर्ण पारदर्शकता आहे. परंतु ही पारदर्शकता ठाणे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये दिसून न आल्याने ठाणे लोकसभेचे माजी खासदार राजन विचारे यांनी मुख्य निवडणूक आयुक्त दिल्ली, मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य तसेच निवडणूक निर्णय अधिकारी ठाणे जिल्हाधिकारी यांना दि. १८/०७/२०२४ व दि. १९/०७/२०२४ पत्राद्वारे लोकसभा निवडणूक प्रक्रियेतील झालेल्या अपारदर्शकता संदर्भात पुरावेसहित पत्र दिले आहे. परंतु अद्यापही याचे लेखी उत्तर प्राप्त न झाल्याने पुन्हा स्मरण पत्र देऊन पत्रामध्ये नमूद केलेल्या लोकसभा निवडणुकीतील वस्तुस्थितीचा खुलासा सादर करावा अशी मागणी पुन्हा केली होती.

## आता नवीन पनवेलमध्ये 'एआय एक्सपेरिमेंटल लॅब'




पनवेल :आधुनिक तंत्रज्ञानाचा वेध घेत नेहमीच विविध कोर्सेस आणि त्या अनुषंगाने प्रयोग करणाऱ्या आणि संगणक क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या 'शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी' या संस्थेचा रौप्य महोत्सव माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (शनिवार, दि. १०) नवीन पनवेल येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी आधुनिक तंत्रज्ञान प्रणाली असलेल्या 'एआय एक्सपेरिमेंटल लॅब'चे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या लॅबमुळे आता विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची होणार ओळख होणार असून शिक्षण क्षेत्रातील आणखी एक पर्वणी मिळाली आहे.

काळानुसार होणाऱ्या बदलाची योग्य वेळी चाहूल लागून संगणकाचे ज्ञान घराघरातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सी-डॅकचे तत्कालीन प्रमुख विवेक सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली १० ऑगस्ट १९९९ रोजी शाहू इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी या संस्थेची जयंत भगत यांच्या नेतृत्वाखाली स्थापना झाली आणि या संस्थेला अल्पावधीतच मोठे यश मिळाले. काळानुसार विविध कोर्सेस या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आले. संस्थेला २५ वर्षे होत असताना विद्यमान पिढीची शैक्षणिक दृष्ट्या आवश्यकता लक्षात घेता आधुनिक तंत्रज्ञान असलेल्या 'एआय एक्सपेरिमेंटल लॅब' उभारण्यात आली आहे.

या कार्यक्रमास एमकेसीएलच्या संचालक विना कामथ, वरिष्ठ व्यवस्थापक अतुल पतौडी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारिणी सदस्य संजय भगत, कामोठे भाजपचे अध्यक्ष रवी जोशी यांच्यासह विविध सेंटरचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## हिवताप, डेंग्यू, जलजन्य व साथरोग आजारांविषयी जनजागृती शिबीर

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सद्यस्थितीत पावसाची ये - जा सुरु असल्याने हिवताप - डेंग्यू, जललन्य व साथरोग आजारांसाठी ही परिस्थिती संवेदनशील आहे. त्या अनुषंगाने नमुंमपा आरोग्य विभागामार्फत हिवताप, डेंग्यू यासारख्या आजारांचा प्रसार रोखण्याकरीता संपूर्ण नमुंमपा कार्यक्षेत्रात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षण, नियोजित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण, घरांतर्गत डासउत्पत्ती शोध मोहीमा नियमित स्वरुपात सुरु आहेत.

या व्यतिरिक्त मलोरिया - डेंग्यू प्रतिबंधात्मक विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महापालिका कार्यक्षेत्रात २४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या परिसरात ३ व ५ ऑगस्ट रोजी विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हिवताप, डेंग्यू तसेच जललन्य व साथरोग आजारांबाबत प्रात्यक्षिके व मॉडेल्ससह जनजागृती करण्यात आली तसेच त्या क्षेत्रातील तापाच्या रूग्णांचे रक्तनमुनेही तपासण्यात आले. दोन दिवस आयोजित केलेल्या या शिबिरांमध्ये एकूण १९,६१५ नागरिकांनी शिबिरांचा लाभ घेतला. या ४८ ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये २४९१ रक्तनमुने घेण्यात आले. हे रक्तनमुने तपासणीअंती अदूषित (Negative) असल्याचे आढळून आले.

या मोहीमांमुळे जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचता येते व त्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि कार्यवाहीची माहिती देता येते हे लक्षात घेत सोमवार दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी श्रावणी सोमवारचे औचित्य साधून २४ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रांच्या परिसरात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

## प्रत्येकाने वृक्षारोपण करुन त्यांचे जतन करावे : आ: प्रशांत ठाकूर



पनवेल : वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. त्यामुळे प्रत्येकाने वृक्षारोपण करुन त्यांचे जतन करावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी धानसर येथे आज (दि. ०९ ) केले. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक झाड आईसाठी' हा उपक्रम राबवण्याचे आवाहन केले होते. त्यांनी केलेल्या या आवाहनाला चांगला प्रतिपसाद लाभत असून शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून धानसर येथे भाजपचे तालुका चिटणीस सुरेश पोरजी आणि बुथ अध्यक्ष जितेंद्र पोरजी यांच्या आयोजनातून वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सुमारे १०० बदाम आणि सागाच्या झाडांचे रोपण करण्यात आले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ही वृक्षारोपण करुन त्यांच्या वाढदिवसानिमीत्त हा उपक्रम राबविल्याबाबदल आयोजकांचे आभार मानले. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनीही वृक्षारोपण केले. या कार्यक्रमाला तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, रवीशेठ म्हात्रे, पापा पटेल, विनोद पाटील, निर्दोष केणी, निलेश पाटील, हरिदास पाटील, नंदकुमार म्हात्रे, पांडुरंग पाटील, चाहुशेठ पाटील, सतीश कदम, मुनाफ पटेल, बाळाराम पाटील, नितीन भोईर, चंद्रकांत पाटील, मिलिंद उलवेकर, रमेश मढवी, लालचंद्र मढवी, गोपीनाथ पाटील, प्रसन्न गोडसे, विश्वनाथ पाटील, प्रभाकर पाटील, आयोजक सुरेश पोरजी, जितेंद्र पोरजी, रामू पोरजी, ज्ञानेश्वर पोरजी, किशोर पोरजी, रमेश पोरजी, सलमान शेख, राजेश तांबोळी, नरेश पोरजी, उदय घरत, आत्माराम पोरजी, भारत घरत, सर्वेश घरत, अनंता पोरजी, अमित पोरजी, अनंता घरत, मुकुंद घरत, बळीराम घरत, सुरज गोंधळी, सोहेल शेख, अमीर पोरजी, विजय पोरजी, राजू पोरजी, मगबूल शेख, आरमान शेख, आशिष बाटे, संजय मांजरेकर, प्रकाश हेगडे, अक्षय पाटील, सलीम शेख, रंजित घरत उपस्थित होते.




नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात येणारा पाणीपुरवठा स्वच्छ व शुध्द असावा यादृष्टीने बेलापूर ते दिघा विभागांतील विविध ठिकाणांहून तसेच मुख्य जलवाहिनीवरून दररोज ११० पाणी नमुने घेऊन त्यांची गुणवत्ता तपासणी पाणीपुरवठा विभागामार्फत नियमित करण्यात येत असते.'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या केंद्र सरकारच्या अभियानांतर्गत लागोपाठ २ आठवडे आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार रविवारी ही मोहीम राबविण्यात आली असल्याची माहिती देत अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी सकाळी ७ वाजल्यापासून पाणी नमुने संकलनाला सुरूवात झाली असून कार्यकारी अभियंता शंकर जाधव व वसंत पडघन, उपअभियंता स्वप्निल देसाई यांच्यासह सर्वच विभागातील उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात ही मोहीम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले असल्याचे सांगितले.

### पेणमध्ये जागतिक आदिवासी दिन जल्लोषात साजरा

## समाज एकसंघी आल्याने तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले : विश्वास वाघ

पेण : ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने संपूर्ण पेण शहरात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी हजारों आदिवासी बांधवांनी मोठ्या जल्लोषात हा दिन साजरा करत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, आदिवासी आदिम कातकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वास वाघ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



यावेळी बोलतांना संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विश्वास वाघ म्हणाले की आदिवासी समाज हा विखुरलेला असताना त्याला एक संघी करण्याचे काम या जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने केले असून समाजाची ताकद पाहता तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असल्याने येणाऱ्या काळात समाजाच्या हिताच्या दृष्टिकोनातून संघटना काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदिवासी ठाकुर समाज अध्यक्ष जोमा दरवडा, जिल्हा सचिव हरेश विर, संघटक महेश ठोंबरा, तालुका सचिव जनार्दन भस्मा, दामा ठोंबरा, कृष्णा खाकर, लक्ष्मण निरगुडा, जनार्दन वारगुडा, राम लेंडी, रंजित पवार, महेश पवार, सुनिल पवार, महादू ढुमणा, शांताराम पवार आदींनी मेहनत घेतली. यावेळी आंबेगाव येथील सौभाग्य इन हॉटेल सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला अनेकांनी हजेरी लावली.

## मुंबई-नाशिक महामार्गावर डेब्रिज टाकणाऱ्यांवर कठोर कारवाईचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

ठाणे : मुंबई नाशिक महामार्गावरील खड्ड्यांची आणि वाहतूक कोंडीच्या समस्येवर करण्यात येणाऱ्या उपायोजनांविषयीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः शुक्रवारी (दि.९ ऑगस्ट रोजी) संबंधित सर्व यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना सोबत घेवून संपूर्ण रस्त्याची पाहणी केली. यावेळी हायवे दिवे ग्रामपंचायतीच्या हद्दीत महामार्गालगत डेब्रिजचा मोठा ढिगारा रस्त्याच्या कडेला टाकलेला आढळून आला. डेब्रिजच्या या ढिगार्याकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लक्ष जाताच मुख्यमंत्री चांगलेच संतापले. त्यांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना याबाबत विचारणा करीत सर्वप्रथम डेब्रिज तात्काळ हटविण्यासाठी संबंधिताना तात्काळ सांगावे आणि तद्नंतर डेब्रिज टाकणाऱ्यावर व संबंधित यंत्रणेवर सक्त कारवाई करण्याचे आदेश दिले.

मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार व जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या सूचनेनंतर तहसिलदार अभिजित खोले यांनी तात्काळ या आदेशाची अंमलबजावणी करीत या परिसरातील नियोजन प्राधिकरण असलेल्या एमएमआरडीए व पंचायत समिती प्रशासनाकडून तातडीने स्पष्टीकरण मागविले असून हे डेब्रिज नेमके कोणी टाकले आहे व संबंधित यंत्रणा कोण आहे याविषयी चौकशी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आली आहे. ही माहिती मिळाल्याबरोबर संबंधितांवर अत्यंत कठोर कारवाई होणार, हे मात्र निश्चित.

## ग्राहकांना देशी सफरचंदांची प्रतीक्षा

नवी मुंबई : वाशी येथील एपीएमसी बाजारात वर्षभर परदेशी सफरचंद बाजारात दाखल होत असतात. जुलैअखेर देशी सफरचंद दाखल होण्यास सुरुवात होते. एपीएमसी फळ बाजारात शिमला, हिमाचल प्रदेशमधील सफरचंद तसेच हिमाचल प्रदेशातील पेर दाखल होण्यास सुरुवात झाली होती. मात्र मुसळधार पावसामुळे त्या भागांतही रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे तेथून देशी सफरचंद दाखल होण्यास उशीर लागत आहे. १५ ते २० ऑगस्टनंतर आवक वाढेल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे. सध्या परदेशी सफरचंदचा हंगाम सुरू असून १८-२० किलोला २००० ते ४५०० रुपये बाजारभाव आहे. देशी फळांच्या हंगामाला सुरुवात होताच वर्षभर सुरू असलेल्या परदेशी फळांची मागणी कमी होते.

देशी सफरचंद ही भरीव, रसरशीत आणि चवीला गोड असल्याने अधिक मागणी असते, अशी महिती येथील घाऊक व्यापारी संजय पिंपळे यांनी दिली.

## भिवंडीमध्ये जागतिक आदिवासी दिनानिमित्त रॅली संपन्न

भिवंडी : एक तीर एक कमान सब आदिवासी एक समान, जल-जंगल-जमीन हमारा नारा है, भारत देश हमारा है.अशा जोश पूर्ण जयघोषामध्ये जागतिक आदिवासी (मूळनिवासी) दिनानिमित्त भिवंडीतील कोंबड पाडा व आसपासच्या परिसरातील आदिवासी बांधवांनी एकत्र येऊन मोठ्या रॅलीचे शिस्तबद्ध पद्धतीने आयोजन करून अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये जागतिक आदिवासी (मूळनिवासी) दिन अत्यंत उत्साह व जल्लोषांमध्ये साजरा करण्यात आला.





संयुक्त राष्ट्र महासभेने१९९४ पासून आदिवासींचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले. यामध्ये समस्त आदिवासींच्या न्याय,हक्क अधिकार आणि आदिवासींचे संस्कृती जतन करून, त्यांची एकूण वेगळी ओळख, त्यांचे अस्तित्व कायम राहण्याच्या उद्देशाने, त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांची उन्नती विकास आणि त्यांच्या हक्कांकडे लक्ष वेधण्याच्या दृष्टीने संपूर्ण भारतातच नव्हे तर जगामध्ये जागतिक आदिवासी (मूळनिवासी) दिन साजरा केला जात असल्याच्या धर्तीवर या रॅलीची सुरुवात राष्ट्रपुरुष व आदिवासी वीर पुरुष क्रांतिवीर बिरसा मुंडा, आदिवासी क्रांतिकारक राघोजी भांगरे, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, दीप प्रज्वलनाने सुरुवात करण्यात आली.

सदर प्रसंगी भिवंडीचे आमदार महेश चौघुले, नायब तहसीलदार दत्ता वांबळे, प्रा.संजय मुंडे,नाना झळके, दत्तू कोलेकर,लक्ष्मण शेळके, सुनील गुंड, प्रकाश तेलीवरे, विकास बाफना, दत्ता शिकारी इ.ची विशेष उपस्थिती लाभली आणि या जागतिक आदिवासी (मूळ निवासी) दिनानिमित्ताने आपआपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने कु. साक्षी जाधव हिने क्रांतीसूर्य बिरसा मुंडा आणि आदिवासी संस्कृती विषयी व प्रतिक लहांगे या छोट्या मुलाने उपस्थितांना सर्व आदिवासी वीर पुरुषांची नांवे व माहिती अत्यंत सुंदर पद्धतीने मोजक्या शब्दात करून दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील झळके यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष जाधव, राहुल झळके, मिलिंद गवे, योगेश शेळ लकंदे, किशोर गवे, राकेश लहांगे, सुरेश धापसे, शैलेश भोईर, विकी जाधव, निलेश नामकोडे इत्यादी आदिवासी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. नाना झळके यांनी रॅलीच्या समारोपानंतर उपस्थित आदिवासी बंधू-भगिनी, नागरिक व विशेष सहकार्य केल्याबद्दल निजामपुरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व सर्व पोलीस कर्मचारी यांचेही आभार मानले.

## धरण भरलेले तरीही पाणी पुरवठा नाही

नवी मुंबई : नवी मुंबईला मोरबे धरणातून पाणी पुरवठा करणारी वाहिनी बेलापूर सीबीडी येथे फुटल्याने शनिवार पासून शहरात पाणी पुरवठा झाला नाही. ऐरोली नेरुळ वाशी कोपरखैरणे, सानपाडा अघोषित पाणी बाणी सारखी परिस्थिती आहे. पाण्याची वाहिनी दुरुस्ती कधी पर्यंत होईल पाणी पुरवठा कधी सुरळीत होईल अशी कुठलीही सूचना न दिल्याने शहरात पाण्याचा खडखडाट झाला आहे.

मोरबे धरण ९० टक्के पेक्षा अधिक भरले असून आता पाणी टंचाई होणार नाही. त्यामुळे शहरात आठवड्यातून दोन ऐवजी एक दिवस पाणी पुरवठा बंद केला जाईल अशी घोषणा मनपा पाणीपुरवठा विभागाने दोन आठवड्यापूर्वी केली. मात्र पाणीपुरवठा नियोजन व्यवस्थित नसल्याने आजही अनेक ठिकाणी पाणी पुरेसे सोडले जात नाही. शनिवारी सीबीडी बेलापूर येथील आग्रोळी गावानजीक पाण्याची वाहिनी फुटली. त्यामुळे शनिवार पासून अनेक ठिकाणी पाणी पुरवठा बंद आहे तो रविवारी सुद्धा तीच परिस्थिती होती. वाहिनीचे दुरुस्ती काम युद्धपातळीवर सुरु असल्याचे आज सांगण्यात आले. शनिवारी जर पाण्याची वाहिनी फुटली तर शनिवारी संध्याकाळी आणि रविवारी सकाळी पाणी येणार नाही. पाणी पुरवठा रविवारी संध्याकाळ पर्यंत सुरळीत होईल अशी कुठलीही सूचना पाणी पुरवठा विभागाने देण्याची तसदी घेतली नाही. या बाबत जेव्हा विचारणा करण्यात आली त्यावेळी हि परिस्थिती समोर आली. त्यामुळे रविवारी अनेक घरात पाण्याचा पूर्णपणे खडखडाट होता, अशी माहिती वसंत वाईकर या कोपरखैरणे सेक्टर १० येथील रहिवाशाने दिली.

## फांगूळगव्हाण पूलाचा प्रश्न सुटला..!

### जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिला न्याय

ठाणे : मुरबाड फांगूळगव्हाण नाल्यावर देशी लाकडी जुगाडाच्या माध्यमातून येथील आदिवासी वाड्यावरील नागरीक ये-जा करीत असतात. पावसाळ्यात येथून ये-जा करताना जीवाला धोका असतो. मात्र दि.८ऑगस्ट २०२४ च्या जिल्हा नियोजन समितीत येथील पुलासाठी ६० लाख़ रुपयांच्या निधीची मान्यता मिळवून देवून या आदिवासी बांधवांची पावसाळ्यात होणाऱ्या त्रासातून जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी कायमची सुटका केली आहे.



मुरबाड फांगूळगव्हाण येथील तीन आदिवासी वाड्यावरील विद्यार्थी, नागरिकांना न्याय देण्याचे काम जिल्हाधिकारी शिनगारे यांनी केले आहे. येथील नाल्यावर पूल उभारण्याचा प्रश्न निकाली निघाला आहे. गेल्या चार दिवसांपूर्वी मुरबाड फांगूळगव्हाण ग्रामस्थांनी नाल्यावर लाकडी पूल जुगाड करून शालेय विद्यार्थ्यांना, नागरिकांसाठी पावसाळ्यात या नाल्यावरुन जाण्यायेण्यासाठी तात्पुरती उपाययोजना केली होती. याविषयीची वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले वृत्त वाचताच त्याची दखल जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी तत्परतेने घेतली.

पालकमंत्री शंभूराज देसाई आणि संबंधित सर्व लोकप्रतिनिधींशी विचारविमर्श करून अवघ्या तीनच दिवसात तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता मिळवून त्यांनी येथील पूलासाठी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर केला. लवकरच या पूलाचे काम सुरु होईल, पूल बांधला जाईल अन् येथील आदिवासी बांधवांचा दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागेल. या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आचारसंहितेच्या पूर्वी आवश्यक ती सर्व कार्यवाही पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिकारी शिनगारे यांनी सूचना दिल्या आहेत.

एखाद्या अधिकाऱ्याने संवेदनशीलतेने काम केल्यानंतर त्याच्या हातून लोकसेवक म्हणून किती चांगले काम होवू शकते, याचे हे एक आदर्श उदाहरण आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१